# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 09 October 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०९ ऑक्टोबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज राज्यातल्या सात हजार ६०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची दूरदृश्यप्रणालीद्वारे पायाभरणी होणार आहे. यामध्ये नागपूर आणि शिर्डी विमानतळ इथल्या कामांचं भूमीपूजन आणि राज्यातल्या नवीन दहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचं उद्घाटन होणार आहे. मुंबई, नाशिक, जालना, बुलढाणा, हिंगोली, वाशिम, अमरावती, भंडारा, गडचिरोली आणि अंबरनाथ याठिकाणी ही वैद्यकीय महाविद्यालयं सुरु होणार आहेत. या महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या जागा ९०० नी वाढणार असून, एकूण ३५ महाविद्यालयात प्रतिवर्ष चार हजार ८५० एमबीबीएस जागा उपलब्ध होणार आहेत. भारतीय कौशल्य संस्था आणि महाराष्ट्रात विद्या समीक्षा केंद्राचे उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेनं सलग दहाव्या वेळी रेपो दर साडे सहा टक्के इतका कायम ठेवला आहे. नवी दिल्लीत बँकेच्या पतधोरण समितीच्या बैठकीनंतर गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. स्थायी ठेव सुविधा अर्थात स्टँडिंग डिपॉझिट फॅसिलिटी दर सहा पूर्णांक २५ टक्के, तर मार्जिनल स्टँडिंग फॅसिलिटी दर आणि बँक दर सहा पूर्णांक सात पाच टक्के इतके आहेत. फेब्रुवारी २०२३ पासून बँकेनं प्रमुख व्याजदर स्थिर ठेवले आहेत. या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत सकल घरगुती उत्पादनाचा वृद्धीदर सहा पूर्णांक सात टक्के इतका राहिल्याचंही बँकेच्या अहवालात म्हटलं आहे.

****

भौतिकशास्त्रातला यंदाचा नोबेल पुरस्कार जॉन जे. हॉपफिल्ड आणि जेफ्री ई. हिंटन या वैज्ञानिकांना जाहीर झाला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता विकासासाठी यांत्रिक शिक्षणात केलेल्या संशोधनाबद्दल हा पुरस्कार त्यांना मिळाल्याचं, रॉयल स्वीडीश अकॅडेमी ऑफ सायन्सेसने जाहीर केलं.

****

ट्रॅकोमा, या संसर्गजन्य नेत्ररोगाची सार्वजनिक आरोग्य समस्या समाप्त करण्यात भारताला यश आलं असल्याची घोषणा जागतिक आरोग्य संस्था डब्ल्यूएचओ नं केली आहे. १९५० ते ६० या काळात हा रोग भारतातल्या अंधपणाचं मुख्य कारण होता आणि याचा प्रसार रोखण्यासाठी सरकारनं १९६३ मध्ये राष्ट्रीय ट्रॅकोमा नियंत्रण कार्यक्रम सुरू केला होता.

****

मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करण्याची आम्हाला घाई नाही, महायुतीची सत्ता कायम राखणं, यावर आपला भर असल्याचं, उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी म्हटलं आहे. आज मुंबईत झालेल्या महायुतीच्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. महायुतीतल्या सगळ्या घटकपक्षांमध्ये बुथस्तरावर समन्वय राखण्यासाठी राज्यातल्या सगळ्या विधानसभा मतदारसंघांमध्ये समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली असून तिन्ही पक्षात संपूर्ण समन्वय आहे, असं यावेळी सांगण्यात आलं. मंत्री शंभूराज देसाई, आमदार प्रसाद लाड, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सरचिटणीस आमदार शिवाजी गर्जे, माजी खासदार आनंद परांजपे, महायुतीचे समन्वयक आशिष कुलकर्णी आणि भाजप माध्यम प्रभारी नवनाथ बन उपथित होते.

****

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचं आज सकाळी छत्रपती संभाजीनगर विमानतळावर आगमन झालं. विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी आदींनी त्यांचं स्वागत केलं. राज्यपाल आज बीड तसंच जालना जिल्हा दौऱ्यावर जाणार असून, विविध क्षेत्रातल्या मान्यवरांशी संवाद साधणार आहेत.

****

शारदीय नवरात्र महोत्सवात आज सातव्या माळेच्या दिवशी श्री तुळजाभवानी देवीची शेषशायी अलंकार महापूजा मांडण्यात आली आहे. भगवान विष्णूंच्या कानातून निर्माण झालेल्या शुंभ-निशुंभ दैत्यांचा तुळजाभवानी मातेने वध केला, या

युद्धानंतर थकलेल्या देवीला विष्णूने आपली शेष शैया विश्रांतीसाठी दिली, अशी आख्यायिका सांगितली जाते. त्या प्रसंगाचं स्मरण म्हणून ही पूजा मांडण्यात येते. दरम्यान, उद्या तुळजाभवानी देवीची भवानी तलवार अलंकार महापूजा आणि परवा ११ ऑक्टोबरला महिषासूर मर्दिनी अलंकार महापूजा मांडण्यात येणार आहे.

****

नागपूर इथं पवित्र दीक्षाभूमीवर दरवर्षीप्रमाणे यंदाही डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्यावतीने ६८ व्या धम्मप्रवर्तन दिन कार्यक्रमाला उद्यापासून प्रारंभ होत आहे. १२ ऑक्टोबरपर्यंत हा सोहळा चालेल. उद्या सकाळी स्मारक समितीचे अध्यक्ष भदन्त आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या उपस्थितीत भिक्खू संघ, उपासक तसंच श्रामणेर यांना दीक्षा देतील. धम्मदीक्षेचा हा कार्यक्रम सलग तीन दिवस चालणार आहे. ११ ऑक्टोबरला पंचशील ध्वजारोहण तर शनिवारी सायंकाळी धम्मप्रवर्तन दिनाचा मुख्य कार्यक्रम होणार आहे.

****